पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्रमांक - 07252-232134.
ई -मेल:- sp.washim@mahapolice.gov.in.
संकेतस्थळ :- www.washimpolice.gov.in.

क्रमांक:- पोअवा/प्रलि-आस्था -1 / पोलीस भरती 2022-2023/जाहीरात/ 1628 / वाशिम. दिनांक :- 29 FEB 2024

## वर्तमानपत्रात प्रसिध्द करावयाचा नमुना
## पोलीस अधिक्षक, कार्यालय वाशिम
## पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम,२०११ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या आणि दिनांक २३.०६.२०२२ च्या सेवाप्रवेश नियमात केलेल्या सुधारीत तरतुदीनुसार पोलीस अधिक्षक वाशीम यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई ६८ रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीव्दारे दिनांक ०५/०३/२०२४ ते दि.३१/०३/२०२४ या कालावधीत स्विकारण्यात येतील. हया बाबतची सविस्तर माहिती Policerecruitment२०२४.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवाराच्या माहीती करीता प्रसिध्द करण्यात आली आहे.

- उमेदवारास पोलीस अधिक्षक यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल.ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुवीधा Policerecruitment२०२४.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- उमेदवार एका पदाकरीता संपुर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो.
- उमेदवाराने चुकीची माहीती दिल्यास,उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रदद् होईल.
- पोलीस शिपाई या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारीरीक चाचणी परिक्षा घेण्यांत येईल व त्यानंतर होणारी लेखी परिक्षा ही सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परिक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदारांने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेवुनच आवेदन अर्ज भरावा.
- भरती प्रक्रियेमध्ये प्रथम शारिरीक चाचणी घेण्यात येणार आहे.शारिरिक योग्यता चाचणीमध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवारामधुन संबधीत प्रवर्गामधील जाहीरात दिलेल्या रिक्त पदाच्या १:१० प्रमाणात उमेदवारांची १०० गुणाची लेखी परिक्षा घेण्यात येईल. उमेदवांराना लेखी परिक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळवीणे अनिवार्य आहे. लेखी परिक्षेमध्ये ४० टक्केपेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.
- सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परिक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल.त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळेस सदरची बाब विचारत घेवुनच आवेदन अर्ज भरावा.
- शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये नमुद केलेल्या दोन निकषांच्या निकालाच्या आधारे उमेदवारांमुधन एक गुणवत्तायादी तयार केली जाईल. तात्पुरत्या निवडसुचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मुळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येईल, कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या निवडसुचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसुचीतील उमेदवारांची निवड तात्पुरती (provisional selection) असेल,शारीरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रीकरण केल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दिं १०/१२/२०२० नुसर अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.
- पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारीरीक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे / कागदपत्रे , सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहीती, परीक्षा शुल्क , आवेदन अर्ज सादर करण्याबाबातची

Scanned with CamScanner

माहीती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवांरासाठी सविस्तर सुचना Policerecruitment२०२४.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहीरातीमध्ये उपलब्ध आहेत. सदरहु जाहीरात उमेदवारांनी काळजीपुर्वक वाचुन, समजुन घ्यावी. तसेच, सामाजिक समांतर आरक्षण व अनाथांकरीता उपलब्ध पदाच्या १ % आरक्षित जागा विचारात घेवुन रिक्त पदाबाबतची खातरजमा करावी. व त्यानंतरच उमदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.

- भरती प्रक्रियेदरम्याण शारीरिक चाचणी व लेखी चाचणी मध्ये निश्चित केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहील्यास, त्यास भरती प्रक्रियेतुन बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परीस्थितीत बदर करण्यात येणार नाही.
- उमेदवारांनी संकेस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेवुनच उमेदवारांने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रर्वगात (Unreserved) अर्ज करु शकतात, परंतु खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागसवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकत नाहीत.
- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रंमाक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहुन व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रंमाक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरीतीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या, संख्येमध्ये बदल होऊ शकतो. व त्याची माहीती वेळोवेळी संकेस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

अनुज तारे, (भापोसे)
पोलीस अधिक्षक, वाशिम

Scanned with CamScanner

## संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची जाहीरात

### महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०२२-२०२३

### पोलीस अधिक्षक, कार्यालय वाशिम

जाहीरात क्रंमाक:- /२०२४ ठिकाण :- वाशिम दिनांक:-

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम,२०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक २३/०६/२०२२ च्या आदेशान्वये केलेल्या सुधारणांनुसार पोलीस अधिक्षक, वाशिम यांच्या आस्थापनेवर सन २०२२-२०२३ मध्ये पोलीस शिपाई संवंगात रिक्त होणारी ६८ पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजीत करण्यात येत आहे.

| | अ.जा | अ.ज | वि.जा. अ. | भ.ज.ब. | भ.ज.क | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्ल्युएस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | 9 | 5 | 1 | - | 3 | 1 | 1 | 14 | 7 | 7 | 20 | 68 |
| कंप्यीकृत आरक्षण | | - | - | - | | - | - | | | | | |
| सर्वसाधरण | 5 | 2 | 1 | - | 2 | 1 | 1 | 4 | 4 | 4 | 6 | 30 |
| महिला 30% | 3 | 2 | - | - | 1 | - | - | 4 | 2 | 2 | 6 | 20 |
| खेळाडु 5% | - | - | - | - | - | - | - | 1 | - | - | 1 | 2 |
| प्रकल्पग्रस्त 5% | - | - | - | - | - | - | - | 1 | - | - | 1 | 2 |
| भुकंपग्रस्त 2% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | |
| माजी सैनिक 15% | 1 | 1 | - | - | - | - | - | 2 | 1 | 1 | 3 | 9 |
| अंशकालीन पदवीधर 5% | - | - | - | - | - | - | - | 1 | - | - | 1 | 2 |
| पोलीस पाल्य 3% | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| गृहरक्षक 5 % | - | - | - | - | - | - | - | 1 | - | - | 1 | 2 |
| अनाथ 1% | | | | टिप - महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ -2018 /प्र.क्र. 182/का.-03/दि. 23/08/2021 नुसार एकुण रिक्त पदाच्या 1% इतकी पदे | | | | | | | | |
| एकुण | 9 | 5 | 1 | - | 3 | 1 | 1 | 14 | 7 | 7 | 20 | 68 |

टिप:- जिल्हा पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबधित उमेदवाराने त्याबाबतची माहीती लाचलुचपत विभाग वाशिम यांना दुरध्वनी क्रंमाक:-07252-235933 वर त्वरीत संपर्क साधुन तक्रार करावी. तसेच या संदर्भात उमेदवार पोलीस अधिक्षक, या कार्यालयातील वरीष्ठ अधिकाऱ्यां शी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समिती सन 2022-2023 तथा पोलीस अधिक्षक यांच्याशी संपर्क साधुन तक्रार करु शकतील.

उमेदवारांना काही अडचणी आल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | दुरध्वनी /मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| 1 | पोलीस अधिक्षक,कार्यालय वाशिम | 07252-234834, मो.नं.8605878254 |

अधिक्षक पोलीस वाशिम

अनुज तारे,
पोलीस अधीक्षक वाशिम.

Scanned with CamScanner